# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २३.०८.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २२.०८.२०२६ चे २३.१० वा. चे सुमारास, मा. पोलीस आयुक्त यांचे एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, अमरावती रोडवरील सब्जी मार्केट जवळ, गुप्ता बिल्डींग येथील, गुप्ता पान शॉपवर पोलीस ठाणे वाडी येथील स्टाफ व पंचासमक्ष रेड कारवाई करुन पानटपरी व गोडवूनची पाहणी केली असता, तिथे राहणारा इसम नामे नितेश नत्थुलाल गुप्ता वय ३८ वर्षे याने शासन प्रतिबंधीत सुंगधीत विमल बिग, रंजनीगंधा, बाबा ब्लॅक, राजश्री पान, सिग्नीचर, मिराज, पान पराग प्रिमीयम व व्हीवन ईत्यादी तंबाखुजन्य पदार्थांचा साठा विक्रीकरीता ठेवलेला मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन एकुण १,१७,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता रात्री उशीरापर्यंत आस्थापना उघडी ठेवुन तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर विक्रीकरीता साठवणुक करून बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरुध्द पोलीस ठाणे वाडी येथे कलम १२३,२२३,२७४,२७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a),३(१)(iv)(zz),५९ अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. उत्तम जायभाये, पोहवा. विजय गिरी, आशिष गायधने, पोअं. अर्शद शेख, मनोज निमकर, दिनेश क्षिरसागर, चंद्रकांत मेहेत्रे व मपोअं गायत्री लांजेवार यांनी केली.



**२) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— चोरी करणाऱ्या महिला आरोपीस अटक.**

पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत, प्लॉट क्र. ७४१, तेलंगखेडी माता मंदीरजवळ, रामनगर येथे राहणारे फिर्यादी शेखर गणेश ठाकुर वय २८ वर्ष हे दिनांक ०२.०८.२०२६ रोजी २२.०० वा. परिवारासह एका कार्यक्रमास गेले होते. तेथून परत आल्यावर त्यांनी सोन्याचे दागिने आलमारीमध्ये ठेवले होते. दिनांक १८.०८.

२०२६ रोजी १७.०० वा. आलमारीतील दागिन्यांची पाहणी केली असता, त्यातील काही दागिने किमती ३,४९,०००/— रु. चा मुद्येमाल दिसला नाही. इतर दागिने तसेच होते. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे उघडया दारातुन, आत प्रवेश करुन, घरातील आलमारीमधील नमुद मुद्येमाल चोरुन नेला अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान अंबाझरी पोलीसांनी फिर्यादीचे घरी येणारे संशयीत यांना विश्वासात घेऊन सखोल विचारपुस केली असता, महिला आरोपी नामे ग्रंथाली आकाश वर्मा वय २३ वर्ष रा. झेंडा चौक, प्रेमनगर, नागपूर हिने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयातील चोरी गेलेला संपुर्ण मुद्येमाल कि. ३,४९,०००/— रु. चा जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनात वपोनि. श्री विनोद गोडबोले, दुपोनि सुनिल मान्टे, पोउपनि राजेश लोही, पोहवा. बलजीत ठाकूर, पोअं. राजु तायडे, प्रविण लोखंडे, लक्ष्मीकांत आखाडे, मपोअ जयश्री गजभिये व दीपीका किरंगे यांनी केली.

**३) गुन्हेशाखा युनिट ३ पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस १२ तासाचे आत अटक.**

दिनांक २२.०८.२०२६ चे १०.१५ वा. चे सुमारास, फिर्यादी श्रीमती सुशिला मोरेश्वर पवनीकर वय ६९ वर्षे, रा. प्लॉट. ७४६, निकालस मंदीर रोड, सुदर्शन चौक, नागपुर हया हारफुल घेण्यासाठी पायदळ दुकानात जात असता, पोलीस ठाणे लकडगंज हद्यीत, अपेक्स मेडीकल स्टोअर्स समोर, निकालस मंदीर रोड येथे त्यांचे मागुन येणाऱ्या एका दुचाकी गाडीवरील अज्ञात इसमाने त्यांचे गळयातील सोन्याची चैन वजनी १२ ग्राम कि ५०,०००/: रु. ची जबरीने हिसकावण्याचा प्रयत्न करीत असतांना, फिर्यादी यांनी चोराचे हाताला झटका दिल्याने, चैन चोरी झाली नाही. आरोपी तेथून पळुन गेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०९(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी त्वरीत दखल घेवुन तांत्रीक तपास करून आरोपीस निष्पन्न करून, सापळा रचुन आरोपी नामे पवन विजय पंजवानी वय ३२ वर्षे, रा. रा. भाजीमंडी, महाल, नागपुर यास ताब्यात घेतले आरोपीने वर नमुद जबरी चोरीचा प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, युनिट क्र. ३ चे पोनि अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>(गुन्हे)</u>**

**<u>पोलीस ठाणे लकडगंज :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २२.०८.२०२६ चे २२.०५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत पेट्रोलींग करीत असता, मालधक्का परिसर, रेल्वे पटरी जवळील रोडवर, एका नंबरप्लेट नसलेलया काळया रंगाचे स्प्लेंडर गाडीवर एक ईसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यांचेकडे जात असतांना तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव व पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव साहील अली मुश्ताक अली वय २० वर्षे रा. कादरिया मदरसा जवळ, हसनबाग, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आत एक लोखंडी चाकु मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०१ लोखंडी चाकु व विनानंबरची स्प्लेंडर मोटार सायकल असा एकुण किंमती ४०,१००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपींविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे हिंगणा</u> :—** दिनांक २२.०८.२०२६ चे १३.०० वा. चे सुमारास, फिर्यादी चेतन गिरधारी धकाते वय २९ वर्ष रा. तांडापेठ, चंद्रभागा नगर, व सोबत एकता सुरेश कळमकर वय २८ वर्षे टिमकी, तिन खंबा, समता नगर, नागपूर असे दोघे सीपीसी कॉलेज, मिहान येथील परिक्षा केंद्रावर परिक्षा देऊन फिर्यादीचे ॲक्टिवा मोपेड क्र. एम.एच. ४९ एवाय ५१७३ ने पोलीस ठाणे हिंगणा हद्यीत अमरावती जबलपुर हायवे, वृंदावन सिंटीकडे जाणारे रोडचे विरुध्द दिशेने जात असता गाडीसमोर अचानक कुत्रा आडवा आल्याने, फिर्यादीचे गाडीवरील नियंत्रण सुटून गाडी स्लीप झाली. त्यामुळे एकता ही खाली पडल्याने तिचे डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाली. तिला उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २३.०८.२०२६ चे ०६.०९ वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांचे सुचनेवरुन पोलीस ठाणे हिंगणा येथे मपोउपनि चंचल पवार ७७६७९३११०५ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**